पुणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ फिजीओथेरपी विभागाच्या वतीने 'रिहॅब फॉर स्पेशली ऐबल्ड' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

या वर्षीचा जागतिक विज्ञान दिवस अपंग व्यक्तींसाठीच्या उपाययोजना या संकल्पनेतून साजरा करण्यात यावा. अशा यु.जी.सी. च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर परिषद आयोजित केल्याचे प्राचार्य डॉ. उज्वल येवले यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र फिजीओथेरपी कॉन्सिलच्या उपाध्यक्षा डॉ. नंदा देशपांडे उपस्थित होत्या.

अपंगत्वावर मात करताना ती व्यक्ती सामाजिक व आर्थिक दृष्ट्या स्वनिर्भर व्हावी यासाठी समाजातील सर्व घटकांचे सहकार्य अपेक्षित आहे. असे यावेळी डॉ. नंदा देशपांडे यांनी सांगितले.
फिजीओथेरपी विभागाचे अधिष्ठाता डॉ. बी. एस. दामले यांनी सांगितले अपंगत्व तात्पुरते असो वा कायमचे त्या व्यक्तीची जीवनशैली उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. अपंग व्यक्तीच्या कुटुंबालाही तुमचा आधार वाटला पाहिजे. ससून हॉस्पिटलचे डॉ गणेश पांडे यांनी हातासाठीचे कृत्रिम अवयव रोपण व त्यातील नविन संशोधनाची माहिती दिली.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनानुसार दिव्यांगांचे वर्गीकरण कसे करण्यात यावे या विषयी डॉ. येवले यांनी माहिती दिली. मिलीटरी हॉस्पिटलच्या डॉ. निता पी. मिश्रा यांनी युध्दात जखमी झालेल्या व्यक्तींच्या पायाच्या दुखापती त्यांचे पुर्नवसन व त्यासाठीच्या सरकारी योजना या संदर्भात माहिती दिली.

यावेळी 'एव्हिडन्स बेस्ड फिजीओथेरपी' या विषयावरील मराठा विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

टिमविचे सचिव अजित खाडिलकर, जनसंज्ञापन विभागाच्या अधिष्ठाता डॉ. गिताली टिळक मोने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्राचार्य डॉ. उज्वल येवले यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. श्वेता कुलकर्णी आणि डॉ. पौर्णिमा पवार यांनी केले.

